माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले द्वितीय अपील**

**अपील क्रमांक : १८७४/२०२१**

**अपिलार्थी**—श्री. महेंद्र चोखोबाजी पाटील

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासकीय अधिकारी,**
**जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, वर्धा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, वर्धा**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०२३**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०६.२०२१ | २७.०७.२०२१ | १८.०८.२०२१ | ३०.०८.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.** २५.०६.२०२१ रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "सन २०१०-२२ मधील प्रलंबित प्रवास भत्त्याच्या देयकाबाबत" माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावरजन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, "आपण मागितलेल्या माहितीकरिता रु. ५२/- माहिती शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावी,असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि.** १८.०८.२०२१ रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०८.२०२१ रोजी सुनावणी घेवून, "अर्जदारास दि. २७.०७.२०२१ अन्वये माहिती पुरविण्यासाठी शुल्क भरण्याकरिता कळविण्यात आले होते, तसेच सदर शुल्क

भरण्याकरिता सदर अर्ज या कार्यालयामार्फत दि. २८.०७.२०२१ रोजी पोस्टमार्फत सादर करण्यात आले आहे. अर्जदार हे बीपीएल मध्ये मोडत नसल्यामुळे सदर मागितलेली माहिती अर्जदारास शुल्क अदा केल्यानंतर पुरविण्याची होती. परंतु सदर पत्र अर्जदाराने प्राप्त न झाल्याचे सांगितल्यामुळे सदर उपलब्ध माहिती अर्जदाराला उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात येत आहेत" , असे आदेशित करून अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३)नुसार आयोगाकडे **दि. ०६.०९.२०२१** रोजी "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. ०६.०९.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. २७.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. महेंद्र चोखोबाजी पाटील उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, वर्धा, श्री. मोहन वसंतराव कुंभारे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारीयांच्यातर्फे श्री. मोहन वसंतराव कुंभारे उपस्थित आहेत..

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले कि, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २८.०७.२०२१ रोजी संबंधीत कार्यालयानुसार माहितीचे पत्र करुन देण्याविषयी सुचित केले. त्याप्रमाणे दिनांक २७.०७.२०२१ रोजी अपिलार्थीला रु. ५२/- इतके शुल्क भरणाबाबत सुचित करण्यात आले. मात्र अपिलार्थी यांनी सदरचे पत्र उशीरा प्राप्त झाले असल्याचा आक्षेप नोंदवित जोडपत्र ब दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन विहित मुदतीत कुठलिही माहिती प्राप्त झाली नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्या विरुध्द प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील सुनावणी दरम्यान अर्जदार यांना संपूर्ण माहिती प्रदान करण्याच्या सुचना जारी केल्या आहे. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांनी दिनांक ३०.०८.२०२१ रोजीच्या आदेशात याबाबत सविस्तर भाष्य केले असल्याचे आढळुन येत आहे. आज झालेल्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्या वतीने अपिलार्थी यांना प्रवास भत्ता संदर्भात कार्यालयीन प्रक्रीयेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली असुन, अपिलार्थी यांच्या मार्च-२०१० ते नोव्हेंबर-२०१० पर्यंतचा प्रवास भत्ता देयका विषयी सविस्तर भाष्य केले असुन, ते खालील प्रमाणे आहे.

"अपिलकर्ता यांनी प्रपत्र अ मध्ये मा. आयुक्त नागपूर तसेच कार्यकारी अभियंता बांधकाम जि. प. वर्धा यांचे पत्रानुसार करण्यात आलेल्या कार्यवाही बाबतची माहिती मिळणेबाबत सन २०१०-२०११ मधील प्रलंबित प्रवासभत्ता देयकाबाबत ऑक्टोबर २०२० पासुन २५ जुन २०२१ पर्यंत चे प्रवास भत्ता देयक निकाली काढण्याबाबत करण्यात



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते

आलेल्या कार्यवाही बाबतच्या झेरॉक्स प्रति मिळणेबाबत मागणी करण्यात आलेल्या माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने अर्जदारास प्राथमिक आरोग्य केन्द्र हमदापूर यांनी केलेला पत्रव्यवहार यासोबत जोडण्यात येत आहे.

सन २०१०-११ अंतर्गत माहे एप्रिल १० ते नोव्हेंबर २०१० पर्यंतचे प्रवास भत्ता देयके रक्कम रु. ९२८०/- व श्री. गुणवंत चाफले शिपाई यांचे मार्च २०१० ते नोव्हेंबर २०१० पर्यंतचे प्रावा भत्ता देयक रु. ७५८/- असे एकुण १००३८/- इतकी रक्कम चेक क्रमांक २०१०८१ दिनांक ३१.०३.२०११ नुसार मा. व्यवस्थापक वर्धा जिल्हा परिषद एम्प्लाईज (अर्बन) को-ऑफ बँक शाखा सेलु येथे अपिलाकर्ता यांनी वैद्यकिय अधिकारी, हमदापूर करीता स्वत:च्या स्वाक्षरीने दिनांक ०१.०७.२०११ रोजी जमा केले आहे.

अपिलाकर्ता यांनी डिसेंबर २०१९ मध्ये जुन २०१० ते डिसेंबर २०११ पर्यंतचे एकुण रकक्म रुपये १२९२४/- चे देयक नव्याने तयार करुन सुमारे नऊ वर्षा नंतर त्यांनी उचल केलेली प्रवास भत्ता देयकाची मागणी परत केली असल्याचे दिसुन येते तसेच त्यांनी सन २०११ मधील प्रलंबित प्रवास भत्ता देयकाची मागणी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत सिमती लेखांसहिता १९६८ चे नियम ४४ नुसार कर्मचाऱ्यांनी आपले प्रवास भत्ता देयक प्रवास संपल्या पासुन एक वर्षाच्या आत आपल्या आस्थापनेवरुन मंजुरी करीता सादर केले पाहिजेत असे असतांना श्री. महेन्द्र चौखोबा पाटील, हे माहितीच्या अधिकाऱ्याचा वापर करुन कार्यालयीन कामकाजात अडचण निर्माण करित आहे. असे वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंन्द्र हमदापूर यांनी दिनांक २२.०७.२०२१ चे पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. सोबत सदर पत्राची व माहे मार्च २०१० ते नोव्हेंबर २०१० चे देयक उचल केल्याबाबतची सत्यप्रत सोबत जोडण्यात येत आहे.

यावरुन हि बाब स्पष्ट होत की, अपिलकर्ता श्री. महेन्द्र पाटील सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक यांनी माहे मार्च २०१० ते नोव्हेंबर २०१० पर्यंत प्रवास भत्ता रक्कम रु. ९२८० /- उचल केलेली असतांना डिसेंबर २०१९ मध्ये माहे जुन २०१० ते माहे डिसेंबर २०११ पर्यंत प्रवास भत्ता देयक रु. १२९२४ /- ची देयके वैद्यकीय अधिकारी प्रा. आ. के. हमदापूर यांना सादर केलेली आहे. अपिलकर्ता यांनी माहे जुन २०१० ते नोव्हेंबर २०१० पर्यंत दुबार देयक सादर केली असल्याचे स्पष्ट होते.

तसेच माहे जुन २०१० ते डिसेंबर २०११ पर्यंतचे देयके एक वर्षाच्या वर झाल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखांसहिता १९६८ चे नियम ४४ नुसार कर्मचाऱ्यांनी आपले प्रवास संपल्या पासुन एका वर्षाच्या आत आपल्या आस्थापेन कार्यालयाला मंजुरी करिता सादर केले पाहिजेत अशी तरतुद असल्याने एक वर्षा नंतर सादर केलेले देयके मंजुर करता येणार नाही. करिता प्रवास भत्ता देयक रु. १२९२४/- अपिलार्थी यांना वैद्यकिय

A-2023/1874-2021/पाटील

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

अधिकारी प्राथमिक आरोग्य केंन्द्र हमदापूर यांनी दिनांक ०४.०३.२०२० चे पत्रान्वये कळविले आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे."

यात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, व विषेशत: महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४४ चे अवलोकन केले असता, दिलेला प्रतिसाद हा माहिती अधिकार कायद्याशी सुसंगत असुन, अपिलार्थी यांना प्रदान केले असुन, यात कार्यालयीन स्तरावर करण्यात आलेल्या कार्यालयीन बाबतचा संपुर्ण तपशील संलग्न केलेला आहे. ही बाब लक्षात घेता, याआधीच अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेल्या माहिती व्यतिरिक्त वरील माहिती असल्यास ती अपिलार्थी यांना विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह वरील अपील अर्ज निकाली काढत असतांना यातील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना याआधीच प्रदान करण्यात आली असल्याची बाब लक्षात घेता, अपिलार्थीस कार्यवाही अपेक्षित असुन, माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) नुसार माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार एखादया विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखादया कार्यवाही मागील खुलाशा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादया कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश होत नाही, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाल काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते * नागपूर *

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २७.०६.२०२३**

जावक क्रमांक 6208 दिनांक 20 AUG 2024

A-2023/1874-2021/पाटील